नि.दि.दा.क्र.४२/२००९
रंजित / सुरेश
वादीचा सा.क्र.०३
**नि.क्र. १२४**

**<u>वादीतर्फे सरतपास विधीज्ञ श्री. आर.डी.किंदर्ले यांचे मार्फत शपथेवर सुरुः</u>–**

०१. मी पुराव्याचा प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला आहे. सदर मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

**<u>प्रतिवादींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.पी.के.थोटे यांचे मार्फत</u>–**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मालकीच्या शेतीचे दस्त अभिलेखावर दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी रंजीत पाटील यांच्या शेतजमीनीचे कागदपत्र पाहिले नाही. रंजीत पाटील यांच्या जमीनीच्या पूर्वेस कोणता गट क्रमांक आहे हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, मौजे खोबना येथे किसन गण्या पाटील यांची शेती होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, किसन गण्या पाटील यांची शेती तिडगाम नावाचे व्यक्ती वहिती करीत होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, किसन गण्या पाटील वारल्यानंतर त्यांची शेतजमीन त्यांची भाची पार्वता वाकडे यांच्या नावे झाली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, पार्वता वाकडे ही त्या शेतजमीनीची वाहिजुपी करीत होती व उत्पन्न घेत होती. हे मला माहित नाही की, सन १९८१ साली पार्वताबाई वाकडे यांनी गट क्र.१९१ ची मोजणी करुन घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, किसन गण्या पाटील यांच्या शेतीला लागुन झिबलाबाई खंडाते यांची शेतजमीन होती. हे मला माहित नाही की, झिबलाबाई खंडाते व बाबुराव खंडाते रा. पांडेगाव यांना पार्वताबाई वाकडे यांनी त्यांचे वकील श्री मेंढुले यांच्या मार्फत १९८३ साली नोटीस पाठवली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, त्यांनी त्या नोटीसचे उत्तर पाठवले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील माहिती मी सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझी शेती

खोबना येथ असल्याची बाब शपथपत्रात नमुद नाही. गट क्र.२४८ या शेतानंतर दोन शेत आहेत व त्यानंतर माझी शेतजमीन गट क्र.११४ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२४८ चे अभिलेखानुसार कोण मालक आहेत हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, किसन गण्या पाटील वारल्यानंतर सन १९९९ पर्यंत गट क्र.२४८ ची वहिती पार्वताबाई वाकडे करीत होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, पार्वताबाई वाकडे वारल्यानंतर ती मिळकत त्यांचे वारस वहिती करतात. किसन गण्या पाटील जिवंत असतांना त्यांची जमीन काही दिवस गणपत गोविंदा गोंड हे वहिती करीत होते. हे मला माहित नाही की, किसन गण्या पाटील हे नागपूर येथे वारले होते किंवा कसे.

०३. मी अशिक्षीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे प्रतिज्ञापत्रात गट क्र.२४८ हे रंजीतच्या सांगण्यावरुन लिहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रंजीत याने सांगितल्या प्रमाणे मी न्यायालयात सांगितले आहे. हे मला माहित नाही की, सन २००४ ते २००५ मध्ये सुरेखा वाकडे यांनी त्या जमीनीत कोणते पिक घेतले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, सन २००५ ते २०१० या कालावधीत पार्वताबाई वाकडे यांच्या वारसांनी गट क्र.२४८ मध्ये कोणते पीक घेतले किंवा कसे. त्यानंतर सुध्दा त्यांनी कोणते पिक घेतले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, रंजीतच्या सांगण्यावरुन आज रोजी मी खोटी साख देत आहे.

**उलटतपास संपला**

**सरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

(पी. के. मुटकुळे)

दि. २५.०२.२०२६.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही, जि.नागपूर.